## डॉ शांतीलाल धनजी देवसी कला महाविद्यालय व वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, वाडा.

### मराठी विभाग

### दिनांक १०-०८-२०२० रोजी घेतलेल्या विभागातील बैठकीचे इतिवृत्त

दिनाक १०-०८-२०२० रोजी मराठी विभागाची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस पुढील सभासद उपस्थित होते.

1. डॉ कैलास प्रभाक्रर जोशी ( विभागप्रमुख, सहयोगी प्राध्यापक)

2. डॉ. किरणकुमार सुबराव कवठेकर ( सहयोगी प्राध्यापक.)

सभेपुढील विषय.

1. मागील बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

2.शैक्षणिक वर्ष २०२० - २१ साठीच्या असलेल्या अभ्यासक्रमाचा आढावा घेणे. तसेच अभ्यासविषपत्रिकांच्या अध्यापन हेतूंचे आणि अपेक्षित परिणामांची चर्चा करणे.

3. शैक्षणिक वर्ष २०२० - २१ साठीच्या कार्यभार वाटपाचे नियोजन करणे.

4..शैक्षणिक वर्ष २०२० - २१ मधील सत्र १ ते ६ मधील अध्यापन कामकाजाचे नियोजन करणे.

5. शैक्षणिक वर्ष २०२० - २१ मधील मराठी विभागामार्फत घेतल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमपूरक व इतर कार्यक्रमांचे नियोजन करणे.

6. आयत्यावेळी उपस्थित होणारे विषय.

विषय १. मागील बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

मागील बैठकीचे इतिवृत्त वाचले जाऊन ते कायम करण्यात आले.

विषय २.शैक्षणिक वर्ष २०२० - २१ साठीच्या असलेल्या अभ्यासक्रमाचा आढावा घेणे तसेच अभासविषयपत्रिकांच्या अध्यापन हेतूंचे आणि अपेक्षित परिणांमांची चर्चा करणे.

शैक्षणिक वर्ष २०२० - २१ साठी असलेल्या मराठी साहित्य या विषयांतर्गत असलेल्या अभ्यासपत्रिकांमधील अभ्यासक्रमाचे अवलोकन करण्यात आले. सदर अभ्यासक्रम शिकविण्यासाठी कराव्या लागणाऱ्या तयारीचा प्राथमिक विचार करण्यात आला. अभ्यासक्रमाच्या तसेच अभासक्रमात अंतर्भूत असलेल्या विषपत्रिकांच्या अध्यापन हेतूंची चर्चा करण्यात आली. काही. अध्यापनहेतू अभ्यासमंडळाने नमूद केले आहेत, तर काही संभाव्य हेतूंची चर्चा करण्यात आली. सदर हेतू इंग्रजीत स्वतंत्रपणे तयार करावे असे ठरले.

विषय ३. शैक्षणिक वर्ष २०२० - २१ साठीच्या कार्यभार वाटपाचे नियोजन करणे.

महाविद्यालयातील मराठी विषयास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या व संभाव्य तुकड्या लक्षात घेतल्या गेल्या. विद्यापीठाने व मराठी अभ्यास मंडळाने प्रत्येक विषपत्रिकेसाठी नियत केलेल्या कार्यभाराचा विचार करण्यात आला. विभागातील शिक्षकांनी कोणकोणत्या विषयपत्रिका शिकवाव्यात हे ठरले. मराठी विभागास पायाभूत अभ्यासक्रम या विषयपत्रिकेचा काही कार्यभार सोपवला जातो हे लक्षात घेतले गेले. सदर कार्यभार मा. प्राचार्यांच्या मर्गदर्शनानंतर वेळापत्रक समितीस कळवावे असे ठरले.

विषय ४. शैक्षणिक वर्ष २०२० - २१ मधील अध्यापन कामकाजाचे नियोजन करणे.

मा. प्राचार्य शैक्षणिक नियोजन समिती, आयक्यूएसी यांनी घेतलेल्या संयुक्त सभेत विद्यापीठाचे वार्षिक नियोजन मांडले गेले.या नियोजनाला अनुसरून मराठी विभागाच्या बैठकीत विद्यापीठाने शैक्षणिक कार्यक्रमातील अध्यापन, परीक्षा व मूल्यमापन याकरीता नियत केलेला कालावधी विचारात घेतला गेला. अध्यापनातील विषयओळख, प्रत्यक्ष अध्यापन, प्रकल्प नियोजन, सातत्यपूर्ण मूल्यमापन या टप्प्यांचा विचार केला गेला. कोरोना संक्रमणाचे स्वरूप तसेच या संदर्भातील ऑनलाईन अध्यापनासंदर्भात विचार केला गेला. झूम मिटींग, मायक्रोसोफ्ट टीम, गूगल क्लासरूम, व्हाटस अप आदी सामाज माध्यमांचा तसेच संपर्क माध्यमांचा वापर करावा असे ठरले. सदर बाबींचा विचार करून सत्र १ ते ६ मधील अध्यापन कामकाजाचे नियोजन तयार करून ते नियोजन समितीस सादर करावे असे ठरेल. सदर नियोजनास आधार म्हणून विभागातील शिक्षकांनी त्यांना नेमून दिलेल्या विषयपत्रिकांच्या अध्यापन नियोजनाचा आराखडा विभागात सादर करावा असे ठरले.

विषय ५. शैक्षणिक वर्ष २०२० -२१ मधील मराठी विभागामार्फत घेतल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमपूरक व इतर कार्यक्रमांचे नियोजन करणे.


शैक्षणिक वर्ष २०२० - २१ मध्ये मराठी विभागाने कोणकोणत्या उपक्रमांचे आयोजन करावे यावर चर्चा करण्यात आली. कोरोना संक्रमणाचे स्वरूप, तसेच जामावाबंदी, टाळेबंदी या साऱ्याचा विचार करण्यात आला. या संदर्भात शासकीय व विद्यापीठाचे आदेश व माननीय प्राचार्य यांचे मार्गदर्शन घ्यावे असे ठरले. यातून निश्चित केलेल्या उपक्रमांचा नियोजन आराखडा करावा असे ठरले. सदर नियोजनाचा समावेष विभागाच्या एकूण नियोजन आराखडयात करण्यात यावा असे ठरले.

विषय ६ आयत्यावेळी उपस्थित होणारे विषय.

मराठी विभागाने नियोजित केलेले उपक्रम महाविद्यालयातील इतर विभागांच्या संयुक्त सहकार्याने करता येतील किंवा कसे हे तपासले गेले, त्यानुसार कार्यवाही करण्यास हरक्त नाही असे ठरेल. बैठकीत चर्चा केले गेलेले विषय व त्यावरील कार्यवाही कागदोपत्री नमूद करून योग्य त्या व्यक्ती व विभागांकडे सोपवावे असे ठरले. सदर साठी मा. प्राचार्यांचे मार्गदर्शन घ्यावे असे ठरले.

सदर चर्चेनंतर बैठक संपली.

स्वाक्षरी




स्थळ व दिनांक

वाडा ११-०८-२०२०.

## डॉ शांतीलाल धनजी देवसी कला महाविद्यालय व वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, वाडा.

### मराठी विभाग

### दिनांक २७-०३-२०२१ रोजी घेतलेल्या विभागातील बैठकीचे इतिवृत्त

दिनांक २७-०३-२०२१ रोजी मराठी विभागाची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस पुढील सभासद उपस्थित होते.

1. डॉ कैलास प्रभाक्रर जोशी ( विभागप्रमुख, सहयोगी प्राध्यापक)

2. डॉ. किरणकुमार सुबराव कवठेकर ( सहयोगी प्राध्यापक.)

सभेपुढील विषय.

१. मागील बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२. शैक्षणिक सत्र २०२०-२१ मधील सत्र २,४,६. मधील अध्यापनकार्याचा आढावा घेणे.

३. शैक्षणिक सत्र २०२०-२१ मधील सत्र २,४,६. मधील मराठी विभागाने घेतलेल्या उपक्रमांचा आढावा घेणे.

४. शैक्षणिक सत्र २०२०-२१ मधील सत्र ५ च्या निकालाची नोंद करणे.

५. आयत्यावेळी आलेल्या विषयावर चर्चा करणे.

विषय १. मागील बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

मागील बैठकीचे इतिवृत्त वाचले जाऊन ते कायम करण्यात आले.

विषय ३. शैक्षणिक सत्र २०२०-२१ मधील सत्र २,४,६. मधील अध्यापनकार्याचा आढावा घेणे.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी असलेल्या मराठी साहित्य या विषयांतर्गत असलेल्या सत्र २,४,६.मधील अभ्यासपत्रिकांचे अध्यापन किती पातळीवर झाले त्याचा आढावा घेण्यात आला. विभागातील शिक्षकांना नेमून दिलेल्या अभ्यासक्रमाचे अध्यापन पूर्ण झाले आहे असे चर्चेत पुढे आले. सदर अध्यापन पूर्ण झाल्याचा अहवाल शिक्षकांनी बैठकीत सादर केला. सदर अहवालात अभ्यासक्रमाचे हेतू विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले असल्याचे, तसेच अध्यापनादरम्यान सामाजिक दृष्ट्या महत्त्वाच्या विषयांवर, जसे लिंगभाव, जातीव्यवस्था, सामाजिक समता आदी चर्चा करण्यात आली असल्याचे ज्ञापन अंतर्भूत असल्याचे नमूद करण्यात आले. सदर अहवाल वाचून ते कायम करण्यात आले.

विषय ३. शैक्षणिक सत्र २०२०-२१ मधील सत्र २,४,६. मधील मराठी विभागाने घेतलेल्या उपक्रमांचा आढावा घेणे.

शैक्षणिक सत्र २०२०-२१ मधील सत्र २,४,६. मधील मराठी विभागाने घेतलेल्या उपक्रमांचा आढावा घेतला गेला. सदर सत्रा विभागाने मराठी वाङ्मय मंडळाच्या माध्यमातून  कै. सु पां कुलकर्णी स्मृतीनिमित्त प्रतिमा पूजन मराठी राजभाषा दिवस असे दोन उपक्रम साजरे केले गेले. कोरोना संक्रमाणामुळे लागू असलेल्या टाळेबंदी व जमावाबंदी यामुळे काही नियोजित कार्यक्रम घेता आले नाही. जे उपक्रम घेतले गेले अशा उपक्रमांचा अहवाल वाचून कायम करण्यात आला.

विषय ४. शैक्षणिक सत्र २०२०-२१ मधील सत्र ५ च्या निकालाची नोंद करणे..


शैक्षणिक सत्र २०२०-२१ मधील सत्र ५ च्या निकालाची प्रत प्राप्त झाली होती. सदर निकालाचे विश्लेषण करून अहवाल तयार करण्यात आला होता. सदर अहवाल बैठकीत वाचून कायम करण्यात आला.

विषय ५. आयत्यावेळी आलेल्या विषयावर चर्चा करणे.

आयत्यावेळी कोणतेही विषय उपस्थित झाले नाही.

सदर चर्चेनंतर बैठक संपली.

स्वाक्षरी.




दिनांक

२८-०३-२०२१